| | | |
|---|---|---|
| दाखल दिनांक | : | १५.०७.२००८ |
| नोंदणी दिनांक | : | १५.०७.२००८ |
| निकाल दिनांक | : | ०४.०३.२०१३ |
| कालावधी | : | वर्षे महिने दिवस |
| | | ०४—०७ —१२ |

**<u>खंडाळा येथील दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर), खंडाळा, यांचे न्यायालयात</u>**

(पीठासीन अधिकारी रू. उ. मालवणकर)

**<u>नियमित दिवाणी मुकदमा क्र.९१/२००८</u>**
**निशाणी क्रमांक /अ**

१. डॉ. राजेंद्र शिवपाद एरंडोले
वय : ५० वर्षे, धंदा : शेती
२. श्री. गोविंद दत्तात्रय धामणकर
वय : ५० वर्षे, धंदा : शेती व व्यवसाय
दोघे रा. लोणंद, ता. खंडाळा, जि. सातारा.

.....**<u>वादी</u>**

<u>विरूध्द</u>

१. श्रीमती रूक्मिणीबाई वाघोबा खरात
(नि. ३८ नुसार अबेट केले)
वय : ६० वर्षे, धंदा : घरकाम
२. सुभाष उत्तमराव शेळके
वय : ३७ वर्षे, धंदा : शेती
आवश्यक पक्षकार
३. अशोक पंढरीनाथ खरात
वय : ५० वर्षे, धंदा : शेती
४. विठ्ठल तातोबा खरात
वय : ४८ वर्षे, धंदा : शेती
५. उत्तम शंकर खरात
वय : ४२ वर्षे, धंदा : शेती

.....**<u>प्रतिवादी</u>**

६. वामन दादू खरात
वय : ४० वर्षे , धंदा : शेती,
७. बाळकृष्ण जयराम खरात
वय : ५० वर्षे, धंदा : शेती,
८. विठ्ठल संभाजी खरात
वय : ४८, धंदा : शेती,
९. माणिक बयाजी खरात
वय : ४५ वर्षे, धंदा : शेती,
१०. संजय मारूती खरात
वय : ४७ वर्षे, धंदा : शेती
११. श्रीमती भागुबाई नवलू काकडे
वय : ६० वर्षे, धंदा : शेती,
१२. श्रीमती विमल जयसिंग खरात
वय : ४५ वर्षे, धंदा : शेती,
१३. राजाराम साहेबराव खरात
वय : ४२ वर्षे, धंदा : शेती,
१४. शकुंतला प्रकाश दुसंगे
वय : ४५ वर्षे, धंदा : शेती,
१५. सिताराम जोगू खरात
वय : ४२ वर्षे, धंदा : शेती,
१६. प्रमोद काशिनाथ खरात
वय : ३८ वर्षे, धंदा : शेती,
१७. नरेंद्र काशिनाथ खरात
वय : ३६ वर्षे, धंदा : शेती, ....**<u>प्रतिवादी</u>**
१८. रंजना संपत वेंगळे
वय : ३२ वर्षे, धंदा : शेती,
१९. वत्सलाबाई काशिनाथ खरात
वय : ६५ वर्षे, धंदा : शेती,
२०. बाळकृष्ण शिवराम खरात
वय : ५५ वर्षे, धंदा : शेती,
२१. जगन्नाथ शिवराम खरात
वय : ५२ वर्षे, धंदा : शेती,
२२. जयसिंग शिवराम खरात
वय : ५० वर्षे, धंदा : शेती,
२२. श्रावण शिवराम खरात
वय : ४८ वर्षे, धंदा : शेती,

| | |
|---|---|
| २३. सिध्दार्थ शिवराम खरात<br>वय : ४६ वर्षे, धंदा : शेती,<br>२४. रंजना पोपट धिवार<br>वय : ४० वर्षे, धंदा : शेती,<br>२५. आशा प्रल्हाद जाधव<br>वय : ३५ वर्षे, धंदा : शेती,<br>२६. शालन जयवंत खरात<br>वय : ५५ वर्षे, धंदा : शेती,<br>२७. संदिप जयवंत खरात<br>वय : ४० वर्षे, धंदा : शेती,<br>२८. प्रविण जयवंत खरात<br>वय : ३८ वर्षे, धंदा : शेती,<br>२९. निलकमल जयवंत खरात<br>वय : ३६ वर्षे, धंदा : शेती,<br>३०. वंदना अनिल काकडे<br>वय : ३५ वर्षे, धंदा : शेती,<br>सर्व रा. लोणंद, ता. खंडाळा, जि. सातारा. | ....**प्रतिवादी** |

**दावा :** दावा वाटप व कब्जासाठी
दावा आकारणी : कोर्टाच्या अधिकारासाठी रक्कम रूपये ४०००/—
दाव्याची आकारणी : कोर्ट फी स्टॅम्पसाठी रक्कम रूपये ११००/—

| | |
|---|---|
| वादींतर्फे विधीज्ञ | : श्री. डी. के. राजेपांढरे |
| प्रतिवादी क्र. १ विरूद्ध | : अबेट |
| प्रतिवादी क्र. २ विरूध्द | : श्री. डी. व्ही. शिंदे |
| प्रतिवादी क्र. ३ ते ३० विरूद्ध | : दावा दिनांक १०.१०.२००९ रोजी काढून टाकण्यात आला. |

## न्यायनिर्णय

( दिनांक ४ मार्च, २०१३ रोजी घोषित करण्यात आला. )

वादीने प्रस्तुतचा दावा आपल्या दावा मिळकतीतील १ आणा हिस्सा ७५ आर जमिनीचे वाटप होऊन त्याचा प्रत्यक्ष कब्जा प्रतिवादी क्र. ३ ते ३० यांच्याकडून मिळण्यासाठी तसेच प्रतिवादी क्र. १ ने प्रतिवादी क्र. २ च्या लाभात केलेले दिनांक ०५.०५.२००८ रोजीचे खरेदीखत आपल्यावर बंधनकारक नसल्याचे जाहीर होऊन

मिळण्याकामी व प्रतिवादी क्र. १ व २ यांनी आपल्या कब्जेवहिवाटीस हरकत अडथळा करू नये अशा निरंतरच्या मनाईकरिता केलेला आहे.

१. वाद मिळकत मौजे लोणंद, तालुका खंडाळा येथील गट नं. ३७६ एकुण क्षेत्र १२ हे ३ आर पैकी १ आणा हिस्सा म्हणजे अविभक्त ७५ आर अशी मिळकत असून तिच्या चतु:सिमा खालीलप्रमाणे नमुद करण्यात आलेल्या आहेत.

| | | |
|---|---|---|
| पूर्वेला | : | ओढा |
| दक्षिणेला | : | फलटण लोणंद रस्ता |
| पश्चिमेला | : | जमीन सर्व्हे नं. ३७२ व ३७३/अ |
| उत्तरेला | : | जमीन सर्व्हे नं. ३७५ |

(या पश्चात या मिळकतीचा उल्लेख 'दावा मिळकत' असा सोईकरता करण्यात येईल)

२. वादीच्या कथनानुसार दावा मिळकतीत वादी व सर्व प्रतिवादींची सामाईक मालकी व कब्जेवहिवाट आहे व त्यांची ७/१२ सदरी हिस्सेवारी नमुद करण्यात आली आहे. वादीच्या कथनानुसार प्रतिवादी क्र. १ हिने दावा मिळकतीतील आपला सामाईकातील १ आणा हिस्सा स्वत:च्या आर्थिक गरजेकरिता विक्री करण्यासाठी काढला होता व त्याची माहिती वादींना मिळाल्यावर प्रतिवादी क्र. १ हिच्याशी बोलणी करून दोघांच्या संमत्तीने व बाजारभावाने मिळकतीची किंमत रक्कम रूपये १,००,०००/— (अक्षरी रक्कम रूपये एक लाख) ठरवून त्याप्रमाणे सदरची रक्कम रोख स्वरूपात प्रतिवादी क्र. १ हिला अदा केली आणि त्याच दिवशी दिनांक २२.०७.१९९६ रोजी प्रतिवादी क्र. १ हिने तिच्या सामाईकातील १ आणे हिश्याचे खरेदीखत वादीच्या लाभात करून दिले आणि त्याच दिवशी मिळकतीचा कब्जादेखील वादीस दिला. या खरेदीखतास प्रतिवादी क्र. १ चा नातु गौतम साहेबराव नाईक याने संमती देऊन साक्षीदार म्हणूनदेखील खरेदीखतावर सही केली. या खरेदीखताच्या रक्कमेबाबत आणि खरेदीखताबाबत प्रतिवादी क्र. १ हिने कोणतीही तक्रार केली नाही असे कथन वादीने केलेले आहे.

३. वादीच्या पुढील कथनानुसार दिनांक २२.७.१९९६ रोजी सदर खरेदीदस्त नोंदणीसाठी सब रजिस्ट्रार ऑफीस, फलटण यांच्याकडे दाखल केला असता तत्कालीन अधिका—यांनी तांत्रिक चूका काढून खरेदीखत नोंदणीकृत करण्याचे नाकारले व त्यानंतर वादी आणि प्रतिवादी क्र. १ यांच्यात कोणताही वाद अथवा तक्रार नसल्याने ते खरेदीखत नोंदणीकृत केले गेले नाही. परंतु, खरेदीखतापासून वादग्रस्त मिळकतीतील १ आणे हिश्यामध्ये वादींची सामाईक कब्जेवहिवाट आहे. पूढे सन २००८ मध्ये सब रजिस्ट्रार, फलटण यांनी वादींना खरेदीदस्तावर बाजारभावाने योग्य मुद्रांक भरण्याकरीता नोटीस दिली. नोटीस प्राप्त झाल्यानंतर वादीने दिनांक १८.०६.२००८ रोजी रक्कम रू. २९,४२०/— (अक्षरी रक्कम रूपये एकोणतीस हजार चारशे वीस) व दिनांक १९.०६. २००८ रोजी रक्कम रू. ५८,८४०/— (अक्षरी रक्कम रूपये अठ्ठावन्न हजार आठशे चाळीस) अशी रक्कम चलनाने स्टेट बॅक ऑफ इंडियामध्ये जमा केली आणि तसे सब रजिस्ट्रार ऑफिस, फलटण यांना कळवले. हा दंड वसुल झाल्यानंतर दिनांक २२.०६. १९९६ रोजीचा खरेदीदस्त सब रजिस्ट्रार, फलटण यांनी दिनांक ०७.०७.२००८ रोजी नोंदणीकृत केला.

४. वादीच्या पुढील कथनानुसार दिनांक २२.०७.१९९६ रोजीच्या खरेदीखतास स्टॅम्प किती भरावयाचा या कारणावरून वादी व सब रजिस्ट्रार, फलटण यांच्यात वाद उद्‌भवल्यानंतर या घटनेचा गैरफायदा घेऊन प्रतिवादी क्र. १ हिने दावा मिळकतीचे बोगस व बनावट खरेदीखत दिनांक ०५.०५.२००८ रोजी प्रतिवादी क्र. २ च्या लाभात करून दिले. वादीच्या कथनानुसार या बेकायदेशीर खरेदीखताच्या आधारे प्रतिवादी क्र. २ वादीस बेदखल करण्याच्या विचारात आहेत. तसेच दावा मिळकत गहाण ठेवण्यास अथवा तिच्यावर बोजा निर्माण करण्याचाही त्यांचा विचार आहे. वादीच्या पुढील कथनानुसार दिनांक ५.५.२००८ रोजीच्या खरेदीखताबाबत वादींनी प्रतिवादी क्र. १ यास दिनांक ०६.०७.२००८ रोजी विचारणा केली असता प्रतिवादी क्र. १ ने 'मी खरेदीखत करून दिले आहे मी माझी जमीन ब—याच लोकांना विकली आहे. तुम्हाला काय करायचे ते करा' असे उत्तर दिले. याबाबत वादीने सब रजिस्ट्रार ऑफीसमध्ये चौकशी

केली असता प्रतिवादी क्र. १ हिने दिनांक २३.१०.२००१ रोजी दावा मिळकतीचे साठेखत काही व्यक्तींना जसे की सौ. धनश्री प्रसाद केदार, सुहास शिवाजी भोईटे, विजय भगवान गुजर, द्वारका प्रभाकर अडसुळे, वैष्णवी विष्णू पाटील यांनी करून दिल्याचे समजले. अशाप्रकारे प्रतिवादी क्र. १ हिने स्वतःकडे कोणतीही मालकी नसताना लोकांची दिशाभूल करून आपला हिस्सा अनेकांना विकण्याचे अमिष दाखवून दावा मिळकतीचे खोटे व्यवहार केल्याचे कथन केले आहे. या पार्श्वभूमीवर त्यांनी प्रस्तुतचा दावा दाखल केला आहे.

५. नि. ३७ वर प्रतिवादी १ याने आपली कैफियत सादर करून दाव्यास आव्हानित केले आहे. त्याने असा बचाव प्रस्तुत केला आहे की, वादी हे शेत जमिनीचे व्यवहार करणारे दलाल असून प्रतिवादी १ ही वयोवृध्द असल्याचा आणि तिच्या असहाय्यतेचा व गरिबीचा फायदा घेऊन अमाप पैसे मिळवण्यासाठी वादींनी प्रस्तुत दावा केला आहे. त्यांच्या पुढील कथनांनुसार सदरची मिळकत ही इनाम वर्गाची असून तिचे पुनर्दान होण्यासाठी येणारा खर्च प्रतिवादीस सोसणे शक्य नव्हते. तसेच बाजारभावाने मिळकतीची किंमती अंदाजे रक्कम रूपये १५,००,०००/— (अक्षरी पंधरा लाख) होत असूनही वादींनी सन १९९६ च्या पोकळ दस्ताने प्रतिवादीस केवळ रक्कम रूपये १,००,०००/— (अक्षरी एक लाख) दिल्याचे दाखवले आहे. परंतु, असा कोणताही पैशाचा व्यवहार वादींनी केलेला नाही आणि रक्कमही दिलेली नाही. त्यामुळे सदरचा व्यवहार हा शर्तभंग झाल्याने बेकायदेशीर ठरलेला आहे असे कथन त्यांनी केले आहे. या प्रकरणाची माहिती वादी यांना असुनदेखील त्यांनी मुदतबाहय दावा केला आहे. त्याचप्रमाणे दावा मिळकत ही इनामवर्ग ६ ब ची असून ती प्रतिवादीचे पूर्वहक्कदार यांना मिळालेली असल्यामुळे ते आवश्यक पक्षकार असूनही वादीने त्यांना दाव्यात सामील केलेले नाही. याउलट दिनांक ५.५.२००८ रोजी प्रतिवादी क्र. २ ने प्रतिवादी क्र. १ यांना रक्कम रू. १५,००,०००/— (अक्षरी पंधरा लाख) देऊन व मोठा खर्च करून दावा मिळकत खरेदीदस्ताने खरेदी घेतलेली आहे व ते खरेदीदस्त नोंदणीकृत करण्यात आले असून त्याची सरकार दप्तरी कायदेशीर नोंदणी झालेली

आहे. तसेच, प्रतिवादी क्र. १ ने प्रतिवादी क्र. २ यांना खरेदी दस्ताप्रमाणे ताबा दिलेला आहे व त्यामुळे दावा मिळकतीचा ताबा वादींना कधीही देण्यात आलेला नव्हता असे कथन त्यांनी पूढे केले आहे. या सर्व पार्श्वभूमीवर वादीने प्रतिवादीस कोर्ट खर्च करून खर्चात टाकलेले असल्याने सदरचा दावा खर्चासहित फेटाळण्यात यावा अशी विनंती केली आहे.

६. प्रतिवादी क्र. २ यांनी <u>नि. ३०</u> वर आपली कैफियत सादर करून दाव्यास आव्हानित केले आहे. त्यांनीदेखील वादीची दाव्यातील कथने अप्रामाणिकपणाची असल्याचे सांगून वादीने आवश्यक ते न्यायालयीन मुद्रांक शुल्क दिलेले नाही. तसेच, आवश्यक पक्षकार सामील केलेले नाहीत अशा हरकती घेतलेल्या आहेत. त्याचप्रमाणे दावा मिळकत ही मिळकतीच्या धारकाचे पूर्वहक्कदारांना तत्कालीन सरकारने इनाम दिली होती व त्यानंतर काही अटी–शर्तीवर तिचे पुनर्दान करण्यात आले. अशा परिस्थितीत मिळकतीचे मालक सरकार असल्याने सरकारच्या परवानगीशिवाय तिचे वाटप करता येणार नाही आणि अशा पध्दतीने केलेले हस्तांतरण कायदेशीर होणार नसल्याने सरकार देखील आवश्यक पक्षकार असल्याने त्या अभावी दावा चालू शकत नाही असे मुद्दे त्यांनी उपस्थित केले आहेत. त्याचप्रमाणे त्यांनी पूढे असा बचाव प्रस्तुत केला आहे की, दावा मिळकतीसंदर्भात प्रतिवादी क्र. २ हे प्रामाणिक खरेदीदार असून प्रत्यक्ष खरेदी क्षेत्रात त्यांची वहिवाट व प्रत्यक्ष कब्जा आहे. त्याचप्रमाणे त्यांनी प्रतिवादी क्र. १ यांना मोबदला म्हणजे रक्कम रू. १५,००,०००/– (अक्षरी पंधरा लाख) देवून दिनांक ५.५. २००८ रोजी दावा मिळकतीचे खरेदीखत केले आहे. याउलट वादीचा तथाकथित खरेदीदस्त कायदेशीर नसल्याचे कथन त्यांनी केले आहे. अशाप्रकारे वादीस कोणत्याही प्रकारची मालकी व वहिवाट नसल्याने त्यांचा दावा फेटाळण्यात यावा अशी मागणी देखील केली आहे. त्याचप्रमाणे गट नं. ३७६ मधील हक्कदारंच्या आपसातील व्यवस्थेनूसार स्वतंत्र वहिवाटी आहेत व प्रतिवादीने खरेदी केलेल्या क्षेत्राच्या पश्चिमेस प्रतिवादी ३ ची वहिवाट आहे आणि त्यामुळे दावा मंजुर झाल्यास प्रतिवादीचे खरेदी क्षेत्र त्याच्या हिश्यास ठेवण्यात यावे असे देखील कथन करून दावा फेटाळण्यात यावा

अशी विनंती त्यांनी केली आहे.

७. उभय पक्षांची वादकथने विचारात घेता मा. पूर्व पीठासीन अधिका—यांनी नि. ३९ वर वादमुद्दे निश्चित केलेले असून दाखल पुरावा विचारात घेता त्यांचे पुढीलप्रमाणे निष्कर्ष नोंदविण्यात आलेले आहेत.

| मुद्दे | | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | दावा मिळकत वादींच्या सामाईक मालकी व कब्जेवहिवाटीची असल्याचे वादी सिद्ध करतात काय? | होकारार्थी |
| २. | वादींनी प्रतिवादी क्र. १ कडुन रक्कम रूपये १,००,०००/— (अक्षरी पंधरा लाख) च्या मोबदल्यात दिनांक २२.०७.१९९६ रोजी तिचा एक आणे हिस्सा खरेदी केल्याचे वादी सिध्द करतात काय ? | होकारार्थी |
| ३. | वादींचा दावा मिळकतीत एक आणे हिस्सा असून त्यांचे वाटप व पृथ्थक कब्जास ते हक्कदार आहेत असे वादी सिध्द करतात काय ? | होकारार्थी |
| ४. | अंतिम आदेश व हुकूमनामा काय ? | दावा खर्चासह मंजूर करण्यात येतो. |

## कारणमीमांसा

८. दाव्यातील कथनांच्या पुष्टयर्थ वादीतर्फे एकूण दोन साक्षीदार अनुक्रमे साक्षीदार क्र. १ गोविंद दत्तात्रय धामणकर नि. ४० व साक्षीदार क्र. २ सौ. बायडाबाई पोपट खरात नि. ४५ यांच्या साक्षी नोंदवण्यात आल्या. तसेच त्यांनी दिनांक २२.०७. १९९६ रोजीचे वादी व प्रतिवादी क्र. १ यांच्यातील नोंदणीकृत खरेदीखत नि. ४६ व मौजे लोणंद, ता. खंडाळा येथील गट नं. ३७६ चा ७/१२ उतारा नि. ५३ वर आणि रे. दि. मु. नं. १३०/२००१ मधील नि. १ ची साक्षांकित प्रत नि. ५४ वर दाखल करण्यात आली आहे. नि. ५५ वर वादीतर्फे लेखी युक्तीवाद सादर करण्यात आला

आहे.

**सर्व मुद्दे एकत्रितरित्या :**

९. दावा मिळकतीच्या खरेदीखतासंदर्भात वादीतर्फे साक्षीदार क्र. १ गोविंद धामणकर यांनी आपल्या जबानी पुराव्यात प्रतिवादी क्र. १ हिच्याकडुन दिनांक २२.७. १९९६ रोजीच्या खरेदीखतानुसार त्याच दिवशी प्रतिवादी क्र. १ हिला रक्कम रू. १,००,०००/— (अक्षरी एक लाख) मोबदला देऊन व त्याच दिवशी तिच्याकडून दावा मिळकतीचा ताबा घेतल्याबाबत आपल्या साक्षीत सांगितले आहे. या खरेदीखतास प्रतिवादी क्र. १ हिचा नातू गौतम नाईक याने संमत्ती देऊन खरेदीखतास साक्षीदार म्हणून सही केली. तथापी, दिनांक २२.०७.१९९६ रोजी सदरचा दस्त सब रजिस्ट्रार, फलटण यांच्याकडे नोंदणीकरीता दाखल केला असता त्यांनी तांत्रिक चूका काढून खरेदीखत नोंदणीकृत करून दिले नाही व तत्पश्चात् वादीस बाजारभावाने मुद्रांक शुल्क भरण्याकरीता नोटीस पाठविली. वादीच्या साक्षीनुसार त्यांनी रक्कम रू. २९,४२०/— (अक्षरी रक्कम रूपये एकोणतीस हजार चारशे वीस) दिनांक १८.०६.२००८ रोजी व दिनांक १९.०६.२००८ रोजी रक्कम रू. ५८,८४०/— (अक्षरी अठ्ठावन्न हजार आठशे चाळीस) अशी रक्कम चलनाद्वारे बॅक ऑफ इंडियामध्ये जमा केली असता सब रजिस्ट्रार, फलटण यांनी दिनांक २२.०७.१९९६ रोजीचे खरेदीखत सर्व पूर्तता करून ७. ७.२००८ रोजी नोंदवले.

१०. या खरेदीखतासंदर्भात वादीतर्फे साक्षीदार क्र. २ बायडाबाई खरात यांनीदेखील खरेदीखतावरील साक्षीदार म्हणून आपली साक्ष नोंदवली आहे. तिच्या साक्षीनुसार सन १९९६ मध्ये प्रतिवादी क्र. १ हिला पैशाची गरज असल्याने तिने दावा मिळकत विक्रीस काढली होती आणि दिनांक २२.७.१९९६ रोजी ती स्वत: प्रतिवादी क्र. १ हिची नातेवाईक म्हणून सब रजिस्ट्रार, फलटण येथे हजर होती आणि त्यावेळी तिच्यासमक्ष प्रतिवादी क्र. १ रूक्मिणी खरात हिने मूळ खरेदीखतावर अंगठा दिला आणि त्याच दिवशी प्रतिवादी क्र. १ हिने जमिनीचा ताबा वादीस दिला असल्याबाबत

साक्ष नोंदवली आहे. तिच्या पुढील साक्षीनुसार आजतागायत वादी हेच दावा मिळकतीचा मालकी हक्काने उपभोग घेत आहेत.

११. एकूणच वरीलप्रमाणे दोन्ही साक्षीदारांच्या साक्षी पुराव्याचे अवलोकन करता वादी व प्रतिवादी क्र. १ यांच्यात दिनांक २२.७.१९९६ रोजी दावा मिळकतीच्या खरेदी विक्रीचा व्यवहार झाला होता असे स्पष्ट होते. इतकेच नव्हेतर नि. ४८ वरील खरेदीदस्ताचे अवलोकन केले असता सदर खरेदीखत त्याच दिवशी नोंदणीकृत करण्याकरीता सब रजिस्ट्रार, फलटण यांच्याकडे सादर करण्यात आले होते असे स्पष्ट होते. तथापि, तांत्रिक हरकतींमुळे दस्त तेव्हा नोंदवला गेला नव्हता आणि तत्पश्चात दिनांक ७.७.२००८ रोजी मुद्रांक जिल्हाधिकारी, सातारा यांच्या आदेशानुसार रक्कम रू. ५८,८४०/— (अक्षरी अठ्ठावन्न हजार आठशे चाळीस) ची दंडाची आकारणी करून सदरचा दस्त नोंदवला गेला असे स्पष्ट होते.

१२. साक्षीदार क्र. २ बायडाबाई खरात ही प्रतिवादी क्र. १ हिची नातेवाईक असल्याबाबत सरतपासात स्पष्ट होते. तथापि, असे असतानाही या दोन्ही साक्षीदारांच्या साक्षी पुराव्यांना कोणत्याही प्रकारे प्रतिवादींच्या वतीने उलटतपास घेऊन आव्हानित करण्यात आलेले नाही. त्यामुळे या दोन्ही साक्षीदारांचा साक्षी पुरावा अविचल राहिल्याचे स्पष्ट होते. प्रतिवादी क्र. २ ने आपली कैफियत सादर केली. परंतु, बचावाच्या समर्थनार्थ कोणताही कायदेशीर पुरावा मात्र न्यायालयासमोर सादर केलेला नाही. किंबहुना, प्रतिवादीच्या लाभातील दिनांक ५.५.२००८ रोजीचे कथित खरेदीखत न्यायालयासमोर दाखल झालेले नाही. प्रतिवादी क्र. २ याने कोणताही पुरावा सादर न केल्याने तो दावा मिळकतीचा प्रामाणिक खरेदीदार असल्याचे सिध्द करू शकलेला नाही असा कायदेशीर निष्कर्ष काढणेदेखील क्रमप्राप्त आहे. या परिस्थितीत दिनांक २२.७. १९९६ रोजीच्या वादीच्या लाभातील खरेदीखताची नोंदणी जरी तांत्रिक अडचणींमुळे दिनांक ७.७.२००८ पर्यंत लांबल्याचे दिसते.

१३. या पार्श्वभूमीवर दावा मिळकत ही सामाईकातील मिळकत असल्याचे नि. ५३ वरील ७ × १२ उता—यावरील नोंदीवरून दिसून येते. प्रतिवादी क्र. ३ ते ३० यांना सहहिस्सेदार या नात्याने दाव्यात सामील करण्यात आले असून त्यांच्याविरूध्द वादींची कोणतीही मागणी नाही. परंतु, वादीचे ७५ आर खरेदी क्षेत्र विचारात घेता ते सहहिस्सेदार नाहीत. वादीच्या क्षेत्राचे खरेदीखत नोंदणीकृत असल्याने त्यात नमूद असलेल्या क्षेत्रांच्या वर्णनाप्रमाणे, चतु:सिमांकीत वाटप होऊन मिळणे हा त्याचा न्याय्य हक्क आहे. त्याचप्रमाणे दिनांक ५.५.२००८ रोजीच्या खरेदीखतासंदर्भात कोणताही पुरावा न्यायालयासमोर आलेला नसल्याने त्यासंदर्भात कोणताही आदेश पारित करणे उचित ठरत नाही. परंतु, एकूणच घटना व परिस्थितीचे अवलोकन करता प्रतिवादी क्र. १ रूक्मिणीबाई वाघोबा खरात व प्रतिवादी क्र. २ सुभाष उत्तमराव शेळके यांच्याकडून वादीच्या मालकी हक्क वहिवाटीस हरकत अडथळा होत असल्याचे चित्र दिसून येत असल्याने त्यांच्याविरूध्द त्यासंदर्भात मनाई हुकूम पारित करणे आवश्यक ठरते. सबब, सर्व मुद्दयांचे निष्कर्ष वादीच्या पक्षात होकारार्थी निघतात व दावा खर्चासह मंजूर करणे क्रमप्राप्त ठरते. सबब, पुढीलप्रमाणे अंतिम आदेश पारित करण्यात येतात.

## आदेश

१. दावा खर्चासहीत मंजूर करण्यात येतो.

२. दावा मिळकत मौजे लोणंद, तालुका खंडाळा, जिल्हा सातारा येथील गट नं. ३७६, एकुण क्षेत्र हे १२—३ आर पैकी दिनांक २२.०७.१९९६ रोजीच्या खरेदीखतात नमूद असलेल्या चतु:सिमांकीत ७५ आर क्षेत्राचे वादीच्या लाभात वाटप करून देण्यात यावे.

३. वादींना मौजे लोणंद, ता. खंडाळा येथील गट नं. ३७६ एकूण क्षेत्र हे १२—३ आर पैकी १ आणा हिस्सा म्हणजे दिनांक २२.०७.१९९६ रोजीच्या खरेदीखतात नमूद असलेले ७५ आर क्षेत्राचा हिस्सा असल्याचे जाहीर करण्यात येते. जिल्हाधिकारी, सातारा अथवा त्यांनी याबाबतीत प्रतिनियुक्त केलेल्या कोणत्याही दुय्यम

राजपत्रित अधिकारी यांनी आदेशानुसार व दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ च्या कलम १५४ नुसार वादीस दावा मिळकतींतील ७५ आर क्षेत्राचे सरस निरस मानाने वाटप करून वादींना त्या क्षेत्राचा शांततामय व खुला कब्जा द्यावा.

४. प्रतिवादी क्र. १ व २ यांनी वादीच्या दावा मिळकतीतील कब्जावहिवाटीस हरकत अडथळा करू नये असा निरंतरचा मनाई हुकूम करण्यात येतो.

येणेप्रमाणे प्राथमिक हुकूमनामा करण्यात यावा.

दिनांक : ०४/०३/२०१३ ( रू. उ. मालवणकर )
खंडाळा. दिवाणी न्यायाधीश क.स्तर,खंडाळा.